नि.फौ.ख.क्र.९८/२०२३
शासन विरुध्द सचिन यादव
नि.क्र.**२२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**
मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – रुपाली अजीत यादव,
वय – ३९ वर्षे, कामधंदा - घरकाम,
राहणार - गुळुंब, ता.वाई, जि. सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती जाधव** -

फिर्यादी मंगल वसंत यादव माझ्या सासू आहेत. आरोपी सचिन यादव माझे चुलत दीर आहेत. घटना दि. ०७.०१.२०२३ रोजी संध्याकाळी ७.०० च्या सुमारास पटटी नावाच्या शेतात गोठयाच्या बाहेर आमच्या गुळुंब गावी घडली होती. तेथे गोठयाला लागुन आमचे घर देखील आहे. घटना घडली त्यावेळी मी घरात होते. माझी सासू धार काढायला गोठयात गेल्या होत्या. त्यावेळी मला माझ्या सासूंचा ओरडण्याचा आवाज आला, त्यामुळे मी बाहेर गेले. तेव्हा मी पाहिले की, माझ्या सासूबाई खाली पडल्या होत्या व आरोपी सचिन हा त्यांना मारहाण करीत होता. तो त्यांना पिंपळाच्या मुळीचे लाकुड हयाने छातीवर मारहाण करीत होता. मी माझ्या सासूंना सोडविले. त्यानंतर तेथे आमचे शेजारी किसन यादव तेथे आले. त्यांनी व मी देखील माझ्या सासूला सोडविले. तेवढयात आरोपी तेथून निघून गेला.

२. त्यानंतर तेथे माझे सासरे आले. त्यांना आम्ही घडलेली घटना सांगीतली व नंतर पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी ते पिंपळाचे लाकूड जप्त केले होते. आरोपी घटनास्थळावरुन ते लाकूड टाकुन निघून गेला होता. मला ते लाकुड दाखविल्यास मी ते ओळखू शकते. आता मला आर्टीकल डी वरील लाकुड दाखविण्यात आले, ते तेच आहे. पोलीस ठाण्यात गेल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी माझ्या सासूला उपचाराकरीता भुईंज येथील सरकारी दवाखान्यात पाठविले होते. त्यामुळे त्यादिवशी उशीर झाला म्हणून दि. ०८.०१.२०२३ रोजी माझ्या सासूने फिर्याद दिली होती. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.आर. गाढवे** -

**३.** हे म्हणणे खरे आहे की, आमची व आरोपीची सामाईकात गुळुंब गावी गट क्र. १६६५ मध्ये विहिर आहे. त्यामुळे त्यात आरोपीचा देखील हिस्सा आहे. त्याप्रमाणे प्रत्येक वाटेकरी पाणी वापरत असतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या सासू सास-यांमध्ये पाणी उपसण्यावरुन पूर्वीपासुनचे वाद होते.

***<u>पुढील उलटतपास तहकूब.</u>***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
*स्वाक्षरी/-*

दि.०५.०७.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२,वाई.